# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
# राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| दुरध्वनी – ०२२ – २२७१७५०० <br> फॅक्स – ०२२ – २२६४२९५५ <br> E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | आरोग्य भवन, ३रा मजला, <br> सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, <br> सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |


जा.क्र.राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/पदभरती/ ६५८८ /२०२१
दि. २६ एप्रिल, २०२१

## सुचना

राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई कार्यालयामार्फत अभियानांतर्गत रिक्त पदे भरण्याकरीता दि. २० मे, २०२० व दि.१५ डिसेंबर, २०२० रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जांची छाननी पुर्ण करण्यात येत असून प्राथमिक छाननीनंतर पात्र व अपात्र उमेदवारांची यादी www.arogya.maharashtra.gov.in व www.nrhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात येईल.

वरील जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना सुचित करण्यात येते की कृपया यादी प्रसिद्ध होताच यादीचे अवलोकन करावे. याबाबत आपली काही शंका/हरकत असल्यास त्या फक्त **nhmrecruit.objection@gmail.com** या ईमेल आयडीवरच आवश्यक पुराव्यासह नोंदवाव्यात. अन्य कोणत्याही ईमेल आयडी वर पाठविलेली शंका/हरकत ग्राह्य धरली जाणार नाही व त्याची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच शंका/हरकतीच्या पृष्ठ्यर्थ सादर करावयाचा पुरावा फक्त पीडीएफ स्वरुपात सादर करावा. ईमेल मध्ये आपले संपुर्ण नाव व अर्ज केलेल्या पदाचे नाव स्पष्ट नमूद करावे. आपली हरकत/शंका कोणत्याही परिस्थितीत यादी प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत वरील ईमेल आयडीवर पाठवावी. त्यानंतर प्राप्त होणारे ई-मेल विचारात घेतले जाणार नाहीत.

सर्व उमेदवारांना सुचित करण्यात येते की उमेदवारांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे त्यांना पात्र व अपात्र घोषित करण्यात आले आहेत. मुलाखतीच्या वेळेस किंवा प्रत्यक्ष नियुक्तीच्या समयी अथवा अन्य कोणत्याही वेळेस पात्र उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांच्या व प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधिन राहून उमेदवारांस पात्र घोषित करण्यात आले आहे. कोणत्याही वेळी उमेदवाराकडे संबंधित पदाकरीता आवश्यक अर्हता नसल्याचे निष्पन्न झाल्यास त्याची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

उपरोक्त पदभरतीच्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणा-या सुचना, याद्या इत्यादी करीता www.arogya.maharashtra.gov.in व www.nrhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळांस नियमीत भेट द्यावी.

26/4/2021

सहसंचालक (अतांत्रिक)
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई